देवतांची उपासना : खंड ३

# श्रीराम

## (शास्त्रीय विवेचन आणि उपासना)

मराठी (Marathi)

संकलक

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे
सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले
पू. संदीप गजानन आळशी

सनातन संस्था

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या २,००० प्रती आणि
या लघुग्रंथाच्या आतापर्यंत ६६,५०० प्रती प्रकाशित !

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

३. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : यानुसार साधना करून २०.९.२०२४ पर्यंत १२८ साधक संत झाले, तर १,०४३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू !

४. ग्रंथ-निर्मिती : ऑगस्ट २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९७ लाख ३३ सहस्र प्रती आणि ५,००० हून अधिक ग्रंथ होतील एवढे लिखाण प्रकाशित होण्याच्या प्रतीक्षेत !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. स्वतःचा देह (नखे, केस आणि त्वचा), तसेच वापरातील

वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधनकार्य अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

७. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

८. कलेचे सात्त्विक सादरीकरण होण्यासाठी संशोधन

९. २०.९.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २१५ अन् अन्य ९०६ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.


१०. 'सनातन प्रभात'च्या माध्यमातून पत्रकारितेचे कार्य

११. भावी आपत्काळात जीवितरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजनांविषयी ग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे आदी माध्यमांद्वारे मार्गदर्शन

१२. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ 'भारत गौरव पुरस्कार' देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – 'www.Sanatan.org'.)**

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !



स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।।

– जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

---

# पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक ‘सनातन प्रभात’मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

# अनुक्रमणिका

१. रामायण ११

२. श्रीरामाच्या काही नावांचा उगम १३

३. रामपरिवार आणि अवतार ४. वैशिष्ट्ये १५

५. रामायणातील काही नावांचा भावार्थ २०

६. रामायणातील काही प्रसंगांचा भावार्थ २५

७. सनातन-निर्मित श्रीरामाचे ‘सात्त्विक चित्र’ आणि ‘नामजप-पट्टी’ ३२

८. श्रीरामाची उपासना ३६

९. आपल्या जीवनातील रामायण ५२

卐 श्रीरामाची आरती (अर्थासह) ५४

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ६१**

---

**टीप** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

# श्रीरामाविषयीच्या ज्ञानाचे महत्त्व

आध्यात्मिक उन्नतीसाठी 'पिंडी ते ब्रह्मांडी' असा प्रवास करायचा असतो. त्याचा अर्थ असा की 'ब्रह्मांडात', म्हणजे शिवात, जी तत्त्वे आहेत ती 'पिंडात', म्हणजे जिवात, यायला हवीत. तरच तो जीव शिवाशी एकरूप होऊ शकतो. पाण्याच्या थेंबात तेलाचा थोडासाही अंश असल्यास तो पाण्याशी एकरूप होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे श्रीरामभक्तात श्रीरामाची सर्व वैशिष्ट्ये असल्याविना तो श्रीरामाशी एकरूप होऊ शकणार नाही; म्हणजेच त्याला सायुज्य मुक्ती मिळणार नाही. याविषयी या लघुग्रंथात दिलेली श्रीरामाची वैशिष्ट्ये साधकांना मार्गदर्शक वाटतील.

श्री गणपति, श्रीविष्णु, श्रीकृष्ण, मारुति, शिव, दत्त, शक्ती, श्री सरस्वती, श्री महालक्ष्मी आणि श्री विठ्ठल यांच्याविषयी विशिष्ट ज्ञान देणारे सनातनचे लघुग्रंथही उपलब्ध आहेत.

# मनोगत

बहुतेकांना देवाविषयी जे थोडेफार ज्ञान असते, ते बहुधा त्यांनी लहानपणी वाचलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टींमुळे असते. अशा अल्प ज्ञानामुळे त्यांचा देवावरचा विश्‍वासही अल्पच असतो. देवतांविषयी अधिक ज्ञान मिळाल्यास जास्त विश्‍वास निर्माण होण्यास साहाय्य होते. विश्‍वासाचे रूपांतर पुढे श्रद्धेत झाल्यामुळे देवतेची उपासना अन् साधनाही चांगल्या प्रकारे होते. तसे व्हावे म्हणून या लघुग्रंथात श्रीरामाविषयी इतरत्र बहुधा न दिलेले; पण उपयुक्त असे अध्यात्मशास्त्रीय ज्ञान देण्यावर विशेष भर दिला आहे.

हा लघुग्रंथ वाचून प्रत्येकाला अधिकाधिक साधनेची स्फूर्ती मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

वाचा सनातनचा लघुग्रंथ !

**श्रीरामरक्षास्तोत्र आणि मारुतिस्तोत्र**

(अर्थासह)

